# क्विक हीलद्वारे कोविड योध्यांना रोगप्रतिकार शक्तीवर्धक औषधाचे वाटप

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) : कोविड-१९ मुळे उद्धवलेल्या अवघड परिस्थितीत डॉक्टर्स, नर्सेस,पोलिस कर्मचारी, स्वच्छता कामगार तसेच वितरक आपले जीव धोक्यात घालून सेवा देताहेत. या पार्श्वभूमीवर क्विक हील सीएसआरने श्री विश्ववती आयुर्वेदीक चिकित्सालय व संशोधन केंद्रासोबत हातमिळवणी करीत जवळजवळ १ लाख कोविड योद्ध्यांना रस माधव वटी या रोगप्रा तिकारशक्तीवर्धक औषधाचे वाटप केले आहे.

आयुर्वेदीक औषधी वनस्पतींपासून तयार केलेल्या या औषधाने सर्दी, खोकला, घसा दुखणे, अंगदुखी, थकवा अशा सामान्य विषाणूजन्य संक्रमणाच्या लक्षणांपासून पासून सुरक्षा मिळते. तसेच या औषधाने पचन, रक्तशुद्धी व श्वासोच्छ्वासासंबधीच्या तक्रारीतही लाभ होतो.

क्विक हील टेक्नॉलॉजिजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर म्हणाले, 'एक जबाबदार नागरिक म्हणून कोविडशी प्रत्यक्ष दोन हात करणाऱ्या आपल्या योद्ध्यांची सुरक्षा पाहणं ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. 'कोविड -१९ वॉ रियर्सला'आयुर्वेदिक औषधांद्वारे सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने श्री विश्ववती आयुर्वेदिक चिकित्सालय आणि संशोधन केंद्राशी सहकार्य करण्यात आम्हाला आनंद होत आहे. भविष्यात देखील आम्ही देशासाठी लढणाऱ्या योद्ध्यांच्या संरक्षणासाठी असे आणखी संभाव्य पुढाकार घेत राहू.'